# प्रेसनोट दि. ०८/०७/२०१९

**दि. ०१/०७/२०१९ ते ०६/०७/२०१९ या आठवडा कालावधीतील सायबर क्राईम पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील प्राप्त तक्रारी अर्जातील डेबीट / क्रेडीट कार्ड फ्रॉडचे बाबतीत अर्जदाराची फसवणुक झालेली रक्कम रुपये ३,२४,४३६/- अर्जदार यांना रिफंड करण्यात आली.**

सायबर क्राईम पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे तक्रारी अर्जापैकी डेबीट / क्रेडीट कार्ड फ्रॉडचे बाबतीत अर्जदाराची फसवणुक झालेली रक्कम जर माहिती (ओटीपी) शेअर केला गेला असेल तर बँकेकडून सदर रक्कम रिफंड केली जात नाही. अशा प्रकारच्या अर्जामध्ये पैसे विविध मर्चंट / वॉलेट पैसे गेले असतात सायबर पोलीस स्टेशन, संबंधित मर्चंट / वॉलेट यांना मेलद्वारे पत्रव्यवहार करुन अर्जदार यांना त्याची रक्कम रिफंड करुन दिली जाते. अशाच प्रकारच्या एका १) अर्जदार नामे अक्षय भेंडे यांचे क्रेडीट कार्ड त्याचे जवळ असताना त्याच्या खात्यावरुन अनधिकृत व्यवहार होवुन त्यांची ८०,०००/- रुपयाची आर्थिक फसवणुक झालेबाबत नमुद आहे. सदरबाबत तात्काळ पेयु या मर्चटशी पत्रव्यवहार करुन त्याचे ९,४००/- रुपये रिफंड करण्यात आले. २) अर्जदार यांचे खात्यावरुन अज्ञात व्यक्तीने ऑनलाईन अनधिकृत व्यवहार करुन त्याची १३,०७२/- रुपये काढुन आर्थिक फसवणुक झालेबाबत नमुद आहे. सदरबाबत कोटक महिद्रा बँकेशी पत्रव्यवहार केला असता त्यांचे पुर्णपणे रक्कम बँकेने परत केली आहे. ३) अभिजित कुमार सिंग यांचे क्रेडीट कार्ड त्याचे जवळ असताना त्याच्या खात्यावरुन अनधिकृत व्यवहार होवुन त्यांची २५,०००/- रुपयाची आर्थिक फसवणुक झालेबाबत नमुद आहे. सदरबाबत आयसीआयसी बँकेशी पत्रव्यवहार केला असता त्यांची पुर्णपणे रक्कम बँकेने परत केली आहे ४) डॉ. हरीप्रसाद ऐटवाल अर्जदार यांचे डेबीट कार्ड त्याचे जवळ असताना त्याच्या खात्यावरुन अनधिकृत व्यवहार होवुन त्यांची १,०२,०००/- रुपयाची आर्थिक फसवणुक झालेबाबत नमुद आहे. सदरबाबत गैाअर्जदार यांचे कडुन पुर्णपणे रक्कम परत केली आहे. ५) अर्जदार शरद जोशी यांचे पेटीएमद्वारे पैसे गेले होते सदरबाबत पेटीएम मर्चंट ला पत्रव्यवहार केला असता पेटीएम एकुण ४६०००/- रुपये रीफंड झाले आहे. ६) जॉन जोसफ कलरीकल यांचे ॲक्सेस बँकेमधुन अनधिकृत व्यवहार होवुन त्यांची १,६२,५८३/- रुपयांची आर्थिक फसवणुक झालेबाबत नमुद होते त्यापैकी सदरबाबत ओलाकॅब, फिव्हचर पे, फोन पे यांचे कडुन ७०,९६५/- रुपये रीफंड झाले आहेत. ७) मोम्महद शहदाब अन्सारी यांची कोणतीही माहिती शेअर न करता ३,९३,०००/- रुपयांची आर्थिक गैरव्यहार झालेबाबत नमुद आहे, त्यापैकी सदरबाबत सीसीॲव्हेन्यु कडुन ४९,९९९/- रुपये रीफंड झाले आहेत. ८) राणी लोंखंडे यांचे बजाज फायनान्स मधुन बोलत आहे असे भासवुन ८,०००/- रुपयांची फसवणुक केली होती त्यामध्ये पीसीएमबी भांडुब, मुंबई या बँकेला तात्काळ पत्रव्यवहार केला असता अर्जदार यांची पुर्णपणे रक्कम रीफंड झाली आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस उप आयुक्त संभाजी कदम, सहायक पोलीस आयुक्त निलेश मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयराम पायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर मधील अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.